जा.क्र./वित्त/आस्था/ 3282/२०२०
कार्यालय वित्त विभाग जि.प. वाशिम.
दिनांक :- ११/६/२०२०.

प्रति,

श्री. दिपक वाघ
माहीती तंत्रज्ञान शाखा
कार्यालय जि.प. वाशिम

**विषय** :- कु.भावना मधूकर पवार, वसले यांची जाहीर अंतीम नोटिस जि.प. वेबसाईटवर प्रसिध्द करणे बाबत.
**संदर्भ** :- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांची मंजूरी दि. ८/६/२०२०

उपरोक्त विषयाने व संदर्भास अनुसरुन कु. भावना मधूकर पवार, वसले हया वित्त विभाग जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत कार्यरत असतांना दिनांक २४/०७/२०१७ पासुन अनाधिकृत गैरहजर आहेत. त्यांची विषयांकीत जाहिरात आपल्या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली आहे. सविस्तर जाहीर अंतीम नोटिस जि.प. च्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

करीता पीडीएफ व मुळ प्रतसह पुढिल कार्यवाहीस्तव पाठवित आहे.

सहपत्र :- जाहीर अंतीम नोटिस मुळ प्रत.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद वशिम**



Scanned with CamScanner

# जाहीर अंतिम नोटीस

प्रति,

कु. भावणा मधूकर पवार, व.स.ले.
पंचायत समिती रिसोड

**विषयः-कामावर हजर होणे बाबत.**

उपरोक्त विषयानुसार आपण वित्त विभाग जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत कार्यरत असतांना दिनांक २४/०७/२०१७ पासुन अद्यापपर्यंत गैरहजर आहे. त्यानुसार आपणाविरुध्द आरोपपत्र दाखल करुन दिनांक २३/१०/२०१९ रोजी शिस्तभंग विषयक खाते चौकशी प्रकरण सुरु करण्यात आलेले होते. खाते चौकशी अधिकारी शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प. वाशिम यांनी खाते चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने १९२३ दि. १८/०५/२०२० रोजी अंतिम बचाव निवेदन बजावण्यात आलेले आहे. तसेच कार्यालयाकडून आपण कर्तव्यावर रुजु होणेबाबत योग्य ते पत्रव्यवहार करण्यात आले. परंतु आपण मुख्यालयी राहत नसल्यामुळे मुळ सेवा पुस्तककावरील पत्त्यावर ज्ञापन व इतर पत्रव्यवहार केला असता परत आले. तसेच मुळ सेवा पुस्तकातील पत्तावर म्हणजेच C/o. श्री मधूकर रामबकसजी पवार वाल्मिकी नगर, आंबेडकर चौक मु.पो. दिग्रस ता.जि. यवतमाळ या पत्त्यावर प्रत्यक्ष रजिष्टर डाकेने पत्र पाठविले असता आपण सदर पत्तावर राहत नसल्याबाबत सर्व पत्र उलट टपाली परत आले आहेत. आपण शासकिय सेवक असल्यानुसार आपण किमान कार्यालयाशी संपर्क करणे आवश्यक होते परंतु आपण अद्यापही मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. वाशिम व मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि. प. वाशिम यांचेकडे प्रत्यक्ष आलेले नाहीत किंवा कुठलाही संपर्क साधलेला नाही. तसेच आपणांस उपरोक्त पत्यावर पाठविलेले सर्व पत्रव्यवहार परत आलेला आहे. यावरुन आपण अनाधिकृत पणे गैरहजर असल्याचे मत आहे.

करिता आपण अद्यापही कार्यालयात हजर झालेले नाहीत व आपले सेवापुस्तकानुसार व इतर उपलब्ध पत्यानुसार पाठविलेला सर्व पत्रव्यवहार परत येत आहे. यावरुन आपण अनाधिकृत गैरहजर असल्याचे स्पष्ट होते. ग्रामविकास विभाग, मुंबई यांचे परिपत्रक दिनांक २२ फेबुवारी २००१ मधिल तरतुदी नुसार अनाधिकृत गैरहजर कर्मचा-याविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करुन त्यांच्या सेवा संपुष्टात आणनेबाबत स्पष्टपणे निर्देशीत केलेले आहे.

करिता आपणांस या जाहीर नोटीस द्वारे अंतिम संधी देण्यात येत असुन आपण आपले वरिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर पंचायत समिती रिसोड येथे किंवा माझे समक्ष दिनांक 15/06 /२०२० पर्यत उपस्थित राहावे. आपण विहीत मुदतीत उपस्थित न राहील्यास आपणांस सदर सेवेशी आवश्यकता नाही असे गृहित धरुन आपल्या सेवा समाप्त (सेवेतुन बडतर्फ) करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

[signature] 8/06/20

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद, वशिम**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वाशिम**

Scanned with CamScanner